# Workshop Arranged for National Social Assistance Programme (http://nsap.nic.in) At Collectorate, Gadchiroli by NIC Gadchiroli



**NSAP training provided by Shri. S.R. Tembhurne, DIO; Tahsildar and staff from all Tehsils in the district were participated in the workshop.**



**Shri. P.D. Badkelwar, RDC, Gadchiroli giving instructions for implementation of web based NSAP Application to the participants.**



**Participants are listening the operational training programme conducted by NIC**



कार्यशाळेला मार्गदर्शन करताना निवासी उपजिल्हाधिकारी बडकेलवार.

# वृद्धापकाळ योजनेच्या १५ हजार लाभार्थ्यांचे संगणकीकरण

गडचिरोली, दि.२२ (शहर प्रतिनिधी)- केंद्र शासनाने विशेष साहाय्य योजनांच्या सनियंत्रण व अंमलबजावणीसाठी आज्ञावली कार्यान्वित केली आहे. यामध्ये इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ योजना, राष्ट्रीय विधवा निवृत्ती वेतन योजना व राष्ट्रीय अपंग निवृत्त योजना अंतर्गत जिल्ह्यातील पात्र लाभार्थ्यांचे संगणकीकरण करण्याचे ठरविले आहे. त्यानुसार इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ योजनांच्या एकूण १५ हजार ५८७ लाभार्थ्यांचे संगणकीकरण झालेले आहे. केंद्र शासनाच्या या सर्व योजनांचे चांगल्याप्रकारे व क्षमतेने सनियंत्रण करण्यासाठी जिल्ह्यातील सर्व तहसीलदार व संजय गांधी योजनांचे अधिकारी, कर्मचारी यांच्याकरिता एक दिवसाचे एनएसपी ही कार्यशाळा जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात निवासी उपजिल्हाधिकारी प्रवीण बडकेलवार यांच्या अध्यक्षतेखाली व एनआयसीचे जिल्हा सूचना विज्ञान अधिकारी शिवशंकर टेंभुर्णे यांच्या उपस्थितीत आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेला जिल्ह्यातील सर्व तहसीलदार, नायब तहसीलदार व संबंधित कर्मचारी उपस्थित होते.

**NSAP workshop news published in daily newspaper “Lokmat” on dated 19.12.2010.**